महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/डिबीटी/विवि/२०२४-२०२५/670 दिनांक : २५-०२-२०२५

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त
सर्व संस्था/ महाविद्यालये,
पुणे विभाग

**विषय :- शै.वर्ष २०२४-२०२५ करिता, डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांकरिता SEBC विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याबाबत.....**

**संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालयनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२०२५/११४ दिनांक २४-०२-२०२५**

महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या खालील योजना राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना

उपरोक्त योजनांतर्गत, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५-०२-२०२५ रोजी **SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांच्या अंमलबजावणीबाबत** बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना राबविणा-या संबंधित प्रशासकीय विभागांनी **SEBC** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दोन्ही योजना राबविण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे, सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.

या विभागीय कार्यालयांच्या अधिनस्त सर्व संस्था/ महाविद्यालये यांना खालीलप्रमाणे सूचित करणेत येते की –

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना या दोन्ही योजना **SEBC** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी व संस्थास्तरावर विशेष मोहिम राबवून योजनांसाठी पात्र असेलल्या **SEBC** प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज तात्काळ भरुन घ्यावेत.
२) **SEBC** प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी सदर योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, यांची दक्षता स्वतः संबंधित प्राचार्यांनी घ्यावी.
३) तसेच, संस्था स्तरांवर प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे भरलेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर / नामंजूर) काढावे आणि

(पान नं २ वर)

४) दि. २९ जानेवारी, २०२५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिदृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता, **उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.** तरी सर्व संस्थांनी व महाविद्यालयांनी, सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्याबाबत तात्काळ कळवून त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावेत.

५) जर यापूर्वी डीबीटी पोर्टलवर **SEBC** प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला सादर करुन अर्ज भरले असतील तर ते सर्व अर्ज विद्यार्थ्यांना परत करुन, त्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांना तात्काळ कळवून सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र- संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५ दि २९-०१-२०२५अन्वये **नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्रासह** डीबीटी पोर्टलवर मुदतीच्या आत अर्ज जमा करण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

तसेच, या कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था व महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, **SEBC** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या योजनेच्या लाभासाठी अर्ज भरताना येणा-या अडचणींच्या निराकरणासाठी या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

तसेच शै.वर्ष २०२४-२०२५ साठी डीबीटी पोर्टलवर संस्था अथवा महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये **SEBC** प्रवर्गातील उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेले/प्राप्त होणा-या अर्जाची (Pending at Principal/Clerk अंतर्गत) तपासणी करताना, ज्या विद्यार्थ्यांना **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड केले असेल, तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन निकाली (मंजूर /नामंजूर) काढावे आणि

जर शै.वर्ष २०२४-२०२५ साठी डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्याने अर्ज भरतेवेळी **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड केले नसेल तर अशा विद्यार्थ्यांचे अर्ज (**"उत्पन्नाच्या दाखल्या ऐवजी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र अपलोड करुन अर्ज भरण्याच्या मुदतीच्या आत पुन्हा जमा करावे"**) (Remarks – Instead of Income Certificate upload the "Non-Creamy Layer Certificate and resubmit the application before last date of submission") परत पाठवून संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांकडून **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अपलोड करण्याबाबत सुचित करावे व अर्ज मुदतीच्या आत पुन्हा जमा करण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देखील योजनेचा लाभ देता येईल.

(मारुती रा जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे